नवप्रभा
गुरुवार दि. १५ जानेवारी २०१५

### हळबे महाविद्यालयात आयोजन

# पाककला स्पर्धेत छाया तळर्णकर प्रथम



हळबे महाविद्यालयात आयोजित पाककला स्पर्धेचे परीक्षण करताना परीक्षक.

दोडामार्ग (न. प्र.)

येथील हळबे महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या खाद्य महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यानिमित्त घेण्यात आलेल्या पाककला स्पर्धेचे प्रथम पारितोषिक छाया तळर्णकर या युवतीने पटकाविले. सदर स्पर्धेचे दुसरे बक्षीस इशा बर्वे (गाजर हलवा), तृतीय निकिती नाईक (खरवस), उत्तेजनार्थ शिवानी गवस (धोंडस), श्वेता धर्णे (वेज पुलाव), रुची नेवरेकर (आंबोळी) यांना प्राप्त झाली. या स्पर्धेला युवतींचा चांगला प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नवनिर्माण शिक्षण संस्थेचे सदस्य सूर्यकांत परमेकर, स्थानिक नियामक समितीचे सदस्य विवेकानंद नाईक उपस्थित होते. परीक्षक म्हणून सौ. स्मिता फातर्पेकर व सौ. मेघा जोशी उपस्थित होत्या. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रा. डॉ. आर. एस. इंगळे, प्रा. एस. एस. पाडगावकर, सौ. किरण नाईक, प्रा. एस. एन. खडपकर यांनी महोत्सव यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.